साप्ताहिक

# अनंत विचार

भारत सरकार मान्यताप्राप्त

संपादक : सचिन हरी आदापुरे मो.नं.९८५००२७६४३

WEEKLY
ANANT VICHAR
वेब पोर्टल | युट्युब न्यूज नेटवर्क
Editor : SACHIN HARI ADAPURE
CELL NO - 9850027643
nageshadapure1978@gmail.com

अनंत विचार चा अंक WHATSAPP वर वाचण्यासाठी आपला WHATSAPP नंबर व नांव वरील नंबरवर SMS करावा

वर्ष : तिसरे | वार:मंगळवार | दि.१० सप्टेंबर २०२४ | किंमत ५ रुपये | पाने : ४ | अंक: ५ | R.N.I.No.-MAH-MAR-2022/83591 | PPR/83/2023-2025

## पंढरीरायाच्या नगरीत धनगर आरक्षणाचे घुमशान.




पंढरपूर – ऐन निवडणुकीच्या तोंडावर राज्यातील २ करोडची मतदार संख्या असलेला आदिवासी धनगर जमात समूह आंदोलनाच्या पवित्र्यात. धनगर एसटी आरक्षणाची मागणी घेऊन संपूर्ण राज्याचे प्रतिनिधित्व करणारा सकल धनगर समाज च्या वतीने पंढरपूर मध्ये टिळक स्मारक मंदिर येथे शेकडो धनगर बांधव आमरण उपोषणाला बसत आहे.

धनगरांच्या मतदानाच्या जिवावर राज्याच्या मुखूमंत्री पदी विराजमान झालेले मा उपमुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस गेली साडेसात वर्षे सत्तेत आहेत. भाजपा शिवसेना युतीने लेखी आश्वासन देऊनही व सत्ता उपभोगूनही गरीब आदिवासी धनगरांच्या जमातीच्या तोंडाला पाने पुसलेली आहे. जमातीमध्ये राज्यातील सर्वच पक्षांच्या नेत्यांबद्दल प्रचंड चिड आणि राग आहे. सनदशीर मार्गाचा अवलंभ करूनही वर्षानुवर्षांची घटनादत्त मागणी मान्य न करणे म्हणजे फुले शाहू आंबेडकरांच्या राज्यात, छत्रपती शिवरायांच्या, मातोश्री पुण्यश्लोक अहिल्यामाईच्या राज्यात लोकशाहीचा व धनगरांच्या न्याय हक्क अधिकाराचा दिवसा ढवळ्या खून पाडला जातोय. आत्ता हा सर्व प्रकार धनगर बांधवांच्या सहनशीलतेचा कडेलोट करणारा आहे. सरकार मुळ प्रश्नाला बगल देऊन धनगरांची घोर निराशा करत आहेत. आत्ता आरक्षणाची अंमलबजावणी केल्याशिवाय माघार नाही हाच उद्देश घेऊन धनगर बांधव ९/९/२०२४ सोमवार पासून पंढरपूर येथे आमरण उपोषणाला बसत आहेत. पांडुरंग मेरगळ, ऍड विजय गोफने, भीमराव सातपुते, दिपकराव बोऱ्हाडे, माऊली हळनवर, विठ्ठल पाटील, सोमनाथ ढोणे, प्रशांत घोडके, संजय लवटे, प्रसाद कोळेकर, संतोष ठोंबरे, अजय गाढवे,योगेश धरम, दिलीप गाडेकर उपस्थित होते.

## सांगोला मतदारसंघ शिवसेना ठाकरे गट लढविणार : जिल्हाध्यक्ष संभाजी शिंदे



पंढरपूर – सांगोला विधानसभा मतदारसंघ हा २००९ पासून महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडे असून त्या जागेवर आमचाच हक्क असून २०२४ ची निवडणूक शिवसेनेतर्फे लढविणार व जिंकणारच, असा विश्वास जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे यांनी व्यक्त केला.

सांगोला तालुका शिवसेनेची (उबाठा) बैठक सांगोला येथे झाली. यानंतर पत्रकार परिषदेत संभाजी शिंदे बोलत होते. ते म्हणाले, बैठकीत गाव तेथे शाखा व घर तेथे शिवसैनिक ही संकल्पना सांगोला विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात राबवत असताना जुने व नवे शिवसैनिक यांचा मेळ घालून संघटन वाढवण्याचे काम करण्यात येत आहे. नवीन शाखा उद्घाटन असेल तेथे जुन्या शिवसैनिकांनी नवीन शिवसैनिकांना बरोबर घेऊन जाण्याचा संकल्प करण्यात आला आहे. शिवसेना युवासेना, महिला आघाडी स्थापन करणे त्याचबरोबर गावोगावी संघटन बळकट करण्याचे नियोजन करण्यात आले. सांगोला विधानसभा मतदारसंघातील उमेदवारी विषयी बोलताना संभाजी शिंदे म्हणाले, २००९, २०१४, २०१९ च्या पंचवार्षिक निवडणुकीत शिवसेनेतर्फेच या मतदारसंघातून निवडणूक गेली आहे. हा मतदारसंघ शिवसेनेचा पारंपारिक. असल्याने २०२४ च्या निवडणुकीत महाविकास आघाडीने तो शिवसेनेला सोडावा, अशी मागणी असून त्यासाठी महाविकास आघाडीतील तीनही पक्षाचे प्रमुख नेते उद्धव ठाकरे, शरद पवार, नाना पटोले यांची भेट घेणार आहोत. या बैठकीस जिल्हा उपप्रमुख सूर्यकांत घाडगे, तालुका प्रमुख अरविंद पाटील, कमरुद्दिन खतीब, तुषार इंगळे उपस्थित होते.

## श्रीनाथ चौक तरुण मंडळ पश्चिम विभाग पंढरपूर (D.A ग्रुप) सन २०२४ गणेश उत्सव






साप्ताहिक अनंत विचार वृत्त

श्रीनाथ चौक तरुण मंडळ पश्चिम विभाग पंढरपूर सालाबाद प्रमाणे याही वर्षी गणेशोत्सव २०२४ मोठ्या उत्साहात साजरा करीत आहे यावर्षी मंडळाचे अध्यक्ष ऋषिकेश साबळे उपाध्यक्ष युवराज रेवडकरी खजिनदार सागर साबळे असून यावर्षी श्री च्या आगमनाची मिरवणूक मोठ्या थाटामाटाने काढण्यात आली.

या मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय दत्तात्रेय आदापुरे सर यांच्या स्मरणार्थ मंडळाच्या वतीने शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, छत्रपती शिवाजी महाराज शिवजयंती, वक्तृत्व स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, रक्तदान शिबिर, हिंदू धर्माच्या परंपरेनुसार असणारे विविध उपक्रम या मंडळाच्या वतीने वर्षभर सुरू असतात.

या मंडळाचे वैशिष्ट्य गरजू गरीब विद्यार्थी विद्यार्थिनींना शिक्षणासाठी, वैद्यकीय लागणारी मदत या मंडळाच्या वतीने तातडीने केली जाते. या मंडळाचे आधारस्तंभ ऋषिकेश दत्तात्रय आदापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे मंडळ कार्य करत आहे या संपूर्ण गणेशउत्सव सोहळ्याला मंडळातील आजी माझी पदाधिकारी सभासद व ज्येष्ठ सभासद आधारस्तंभ व्यापारी आदी सर्वजण बहुसंख्येन गणेश उत्सवामध्ये आवर्जून उपस्थित असतात.




तंटक हॉस्पिटल



डॉ.सुरज निंबराज तंटक
कन्सल्टींग फिजीशियन
M.B.B.S. के.ई.एम. हॉस्पिटल मुंबई
DNB (Internal Medicine)
डॉ. हेडगेवार हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर
CCEBDM डाईबेटीस सर्टिफिकेट कोर्स, चेन्नई
Reg.No. 2014052476




आजारांवर उपचार
* हृदयरोग * डेंग्यू * टायफाईड
* मधुमेह * कावीळ * थायरॉयड
* मेंदुरोग * दमा * फिट येणे
* उच्च रक्तदाब * पोटाचे विकार * डोकेदुखी (मायग्रेन)
* अर्धांग वायु (पॅरालिसीस) * सर्पदंश * चक्कर येणे
* विषबाधा * पॉयजनिंग
* किडनीविकार * संधिवात * टीबी
* रक्ताचे आजार उदा. रक्त कमी असणे, पेशी कमी होणे जास्त होणे इ. * न्यूमोनिया

उपलब्ध सुविधा
* अत्यावश्यक सेवा * अत्याधुनिक एक्स–रे मशिन
* मल्टीपॅरा मॉनिटर्स * सर्वसोयीनियुक्त प्रायवेट रुम्स
* नेब्युलायझर * सेंट्रल ऑक्सिजन सिस्टिम
* अत्याधुनिक अतिदक्षता विभाग * डे केअर सेंटर
* सिरींज पंप * पॅथॉलॉजी लॅब
* ई.सी.जी. * डिफ्रीब्रिलेटर

* ओपीडी वेळ : स. १०.३० ते दु. ३, सायं. ६ ते रात्री ८ पर्यंत
* अपॉईंटमेट *
8010061394
तिरुपती लाड प्लाझा, हॉटेल राधेश शेजारी, के.बी.पी. कॉलेज चौक, पुणे रोड, पंढरपूर

# संपादकीय

## तूच कर्ता आणि करविता-विघ्नहर्ता

गणेश चतुर्थी हे मराठी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्ष चतुर्थीला केले जाणारे एक धार्मिक व्रत आहे. गणेशाच्या अवतारांपैकी गणेश याचा जन्म भाद्रपद शुक्ल चतुर्थीला झाला असे मानले जाते. गणेश चतुर्थी या दिवसाला महासिद्धीविनायकी चतुर्थी किंवा शिवा असेही म्हणले जाते. या चतुर्थीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आणि स्थान आहे. असे मानले जाते की, गणेशाला प्रसन्न केल्याने घरात सुख समृद्धी आणि शांती प्रस्थापित होते. गणेशाला मोदक खूप आवडतात. म्हणूनच गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशाला मोदकांचा नैवेद्य अर्पण केला जातो, त्याचप्रमाणे जास्वंदीचे फुल, शमी पत्री आणि दुर्वा या ही खूप आवडीच्या असल्यामुळे त्याही अर्पण केल्या जातात. उंदीर हे गणेशाचे वाहन आहे.स्त्रीमनाचे लोकदैवत असे ही श्री गणेशाला मानतात. गणेश चतुर्थीच्या पहिल्या दिवशी गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते आणि गणपतीच्या पूजेनंतर आरती केली जाते. प्रमुख्याने माती पासूनच बनवलेल्या गणेश मूर्तिचे पूजन केले जाते. पत्रकारितेच्या इतिहासातील प्रखर तेजस्वी सूर्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या नांवे 'जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ पत्रकारांना मिळतो. याचाच अर्थ असा लो. टिळकांच्या राष्ट्रभक्ति, लोकशक्ति आणि अन्याय मुक्तिला वाहिलेल्या ओजस्वी पत्रकारितेचे परंपरा आजही अखंड अविरत चालू आहे असाच होतो. लोकमान्य टिळक हे ब्रिटिश सरकार बद्दल लोकांच्या मनात असंतोष निर्माण करणारे नेते म्हणून एकीकडे कार्य करीत होते. त्याचवेळी त्यांचा आवडत्या विषयांचा अभ्यासही चालू होता. त्यामुळेच राष्ट्रीय पातळीवर सामाजिक परिस्थितीवर आणि प्रासंगिक घटनांवर 'केसरी'तून लेख करतानांही टिळकांनी आर्याचे वस्तिस्थान 'ओरायन' शास्त्रीय पंचांग 'गितारहस्य' असे ग्रंथ लिहून आपल्या अभ्यासाचा परिचय घडविला. यापुढील काळात सामाजिक सुधारणेच्या प्रश्नावरुन टिळक व आगरकर यांच्यात मतभेद निर्माण झाले. भारतीयांना एकत्र आणण्यासाठी आणि विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी सार्वजनिक गणेश उत्सवाची सुरुवात लोकमान्य टिळकांनी १८९४ साली केली. या काळात गणेशाच्या उपस्थितीत अनेक धार्मिक,सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रम केले जातात. भारतीय स्वातंत्र्य लढयाबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सावाच्या व्यासपीठाचा वापर केला. गणेशोत्सव आणि शिवजयंती या प्रसंगांचे औचित्य साधून टिळकांनी युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्याचा प्रयत्न केला. भारतीय संस्कृतीत प्रत्येक तत्व मनावर ठासविण्यासाठी काही प्रतिके सांगीतलेली आहेत. आम्हाला बाप्पा तू सद्सदविवेक बुध्दीचे प्रतिक वाटतोस. चांगल्या वाईटाचा सत्य-असत्याचा,पाप-पुण्याचा निवाडा करण्याची क्षमता देणारा तू देव आहेस. म्हणुनच तुला बुध्दीदाता म्हटले जाते. आज समाजाला या सद्सद्विवेक बुध्दीदात्या श्री गणेशाची पूर्वी कधी नव्हती एवढी आज गरज आहे. कारण आजवर नव्हता एवढा समाज अध: पतनाच्या उंबरठयावर उभा आहे. तुझ्यापुढे उभे राहिल्या वर माणसाच्या मनातल्या सद्भावना, सहानुभुती, सहृदयता, सज्ञनता, सद्विचार, समभावना, सहभावना जाग्या होतात आणि तो 'मी' ऐवजी 'आपण' 'माझे' ऐवजी 'आपले' असा विचार करायला आपण प्रवृत्त होतो, हेच तुझे अवतार कार्य आहे. भारतीय संस्कृतीत मूर्ती पूजाही एक थोर आणि मधुर अशी कल्पना आहे. माणसाला स्वत:चा उतरोत्तर अधिक विकास करुन घेता यावा म्हणुन जी अनेक साधने भारतीय संस्कृतीने निर्माण केली, त्यातील एक आहे मूर्तीपूजा. मनुष्य प्राणी हा जन्मत: च विभूती पूजक आहे. आपल्या पेक्षा जे मोठे आहेत,त्यांचे आपण कौतूक करतो. आपल्याहून जे थोर आहेत बुध्दीने,प्रतिमेने,विचाराने महान आहेत त्यांची पूजा करावी असे माणसाला वाटते. ही पूजा आपण त्यांच्या आदर्शाची करतो,म्हणूनच त्या आदर्शाचे अनुकरण करण्याची प्रेरणा मनाला कार्य प्रवृत्त करते. बाप्पा! तुझ्या आगमनानं आज सारं महाराष्ट्र राज्य रोमांचित,हर्ष भरित झालं आहे. खरोखरंच राज्याची काही पुण्याई आहे, म्हणुन संभवामि,युगे-युगे असे म्हणत. हजार पाचशे वर्षातून केव्हा तरी एकदा अवतार घेणारा परमेश्वर, दरवर्षी नित्य-नेमाने तुझ्या रुपाने या राज्यात अवतरतो. तेव्हा गहिवरुन येतं,तुझ्या नुसत्या दर्शनाने पोर्णिमेच्या चंद्राला पाहुन सागराला भरती यावी,तशी जन सागराला उचंबळुन भावनांची भरती येते. तुझ्या नुसत्याना मोचाराने जीवनातील दुख: संकटे,विघ्ने, अडचणी,प्रश्न,समस्यायांना सामोरे जाण्याची शक्ति-स्फुर्ती लाभते. तुझ्या नामस्मरणात अपारसाम आहे. भारतीय संस्कृतीचे मांगल्य, तुझ्या मुर्तीत एकवटलेले आहे. उत्तुंग आणि भव्य तुझ्या मुर्तीमध्ये आम्हाला हिमालयाच्या गिरी शिखरावरील शिव,कन्याकुमारीच्या तेजस्विनीचे सौंदर्य आणि वेद-उपनिषद-रामायण-महाभारतातील,सत्याचा म्हणजे सत्य-शिव-सुंदरतेचा प्रत्यय येतो. शिवाची शक्ति,सत्त्याचे सामर्थ्य आणि सौंदर्यातील ममत्व तुझ्या ठायी सामावलेले आहे. म्हणुनच तु भक्तांच्या नवसाला पावतोस,त्यांची मनोकामना पूर्ण करतोस,त्यांच्यावरील संकटाचे निवारण करतोस कारण तू जगज्येठी आहेस,तूच कर्ता-करवीता आहेस. तुझ्या ठायी,ज्ञान-भक्ति आणि कर्मयांचा हृदय यंगम संगम आहे. तू खरा उदारदाता आहेस,मेघ जसे सारे पाणी देऊन टाकतात,झाडे-फळे देऊन टाकतात,फुले सुगंध देऊन टाकतात,नद्या ओलावा देऊन टाकतात,सुर्य-चंद्रप्रकाश देतात. तूही 'जो-जो वांछिले, तो तेलाहो' म्हणत साऱ्या भक्तांची इच्छापूर्ती करतोस. तू समाजाती लदंभ, आळस, अज्ञान,रुढी, भेद-भाव,उच्च निंच पणा,वौमनस्य,दारिद्र्य,दु:ख, दैन्य, दुबळेपणा,भ्याडपणा दुर व्हावा. यासाठी तुझ्या विचारांचे,प्रेरणांचे अधिष्ठान,ही आजच्या समाजाची गरज आहे.

## पैठण येथील सुवर्णकार समाजसेवक चंद्रकांत अंबिलवादे व सतीश उदावंत यांचा पोलीस विभागाकडून गौरव.....



पैठण ( प्रतिनिधी):- पैठण येथील सुवर्णकार समाजाचे समाजसेवक श्रीसंत एकनाथ महाराज पालखी सोहळ्याचे व्यवस्थापक तथा श्रीसंत नरहरी महाराज लाड सुवर्णकार संस्था श्रीक्षेत्र नाशिक त्रंबकेश्वरचे बांधकाम समिती सदस्य ह.भ.प.चंद्रकांत अंबिलवादे व श्रीसंत एकनाथ महाराज अन्नछत्रलयातील प्रमुख सतीश भाऊ उदावंत यांच्या कार्याबद्दल छत्रपती संभाजीनगर पोलीस विभागाकडून पोलीस अधीक्षक डॉ. विनायकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक सुनिल लांजेवार, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे, पैठण पोलीस निरक्षक संजय देशमुख यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर येथे पोलीस अधीक्षक विभागाकडून आयोजित कार्यक्रमात प्रम णपत्र देऊन गौरव करण्यात आला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

## मनसेच्या वतीने वैद्यकीय सेवा बजावणाऱ्या सर्व डॉक्टर्स बंधूंचा मनसे गौरव..



पंढरपूर प्रतिनिधी/ काळ वेळ न पाहता जे होतात रुग्णसेवेत रुजू सांगा डॉक्टर तुमचे उपकार कोणत्या शब्धात मोजू या वाक्याप्रमाणे पंढरपूर शहर व तालुक्यात गेली अनेक वर्ष अविरतपणे वैद्यकीय सेवा बजावून लोकांचे प्राण वाचवून हजारो लोकांना जीवनदान देऊन त्यांचे कुटुंब आनंदी आणि सुखी राहावे यासाठी अविरतपणे काम करणाऱ्या माणसातील देव माणूस असलेल्या पंढरपूर येथील सर्व डॉक्टर्स बंधूंचा गौरव व सन्मान महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसे नेते दिलीपबापू धोत्रे यांच्या हस्ते पार पडला.

याप्रसंगी व्यासपीठावर श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, आय.एम.ए अध्यक्ष डॉ. शितल शहा, निमा अध्यक्ष डॉ. अमरसिंह जमदाडे, डेंटल असोसिएशन अध्यक्षा डॉ. सौ. ऋचा खूपसंगीकर, होमिओपॅथी असोसिएशन अध्यक्षा डॉ. सौ. जयश्री शिनगारे, पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. महेश सुडके, तालुका वैद्यकीय अधिकारी एकनाथ बोधले उपस्थित होते.

याप्रसंगी डॉक्टर्स बंधूंशी संवाद साधताना मनसे नेते दिलीपबापू धोत्रे यांनी सुरुवातीला सर्व डॉक्टर्स बंधूंचे आभार मानून आपला परिचय करून देताना शालेय जीवनापासून आतापर्यंतच्या राजकीय प्रवासाला उजाळा देत मनसेच्या वतीने पंढरपूर शहरात केलेल्या सामाजिक कार्याची माहिती दिली.

यानंतर पंढरपूर येथील सर्व डॉक्टर संघटनेचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि वैद्यकीय क्षेत्रात काम करत असणाऱ्या सर्व डॉक्टर्स मंडळींचा भगवी शाल, फेटा बांधून पुष्पहार घालून व मनसे गौरवचिन्ह देऊन

मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या हस्ते सन्मान करून मनसे गौरव सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला.

या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि डॉक्टर संघटनेच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक ४ सप्टेंबर २०२४ रोजी पंढरपूर येथील लिंक रोड वरील हॉटेल चतुर्थी हॉल येथे करण्यात आले होते.

यावेळी मनसे जिल्हा अध्यक्ष प्रशांत गिड्डे,, संतोष कवडे, गणेश पिंपळनेरकर, अनिल बागल, ॲड. संदीप रणनवरे, ॲड. पराग जहागीरदार, उद्योजक सुहास शिर्के, आदित्य फत्तेपूरकर, अनिल सप्ताळ, शशिकांत पाटील यांच्यासह सर्व डॉक्टर्स संघटनांचे पदाधिकारी आणि डॉक्टर्स बंधू उपस्थित होते. मनसे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांनी मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या कामाची दखल घेऊन राज्यातील मनसेचा पहिला उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची घोषणा झाल्यानंतर त्यांना जनतेचा तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींचा वाढता पाठिंबा मिळू लागला. यामध्ये मोठी भर पडली ती विठ्ठलचे चेअरमन अभिजीत पाटील यांची यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत दिलीप धोत्रे यांची ताकत व अभिजीत पाटील यांची ताकत एकवटुन धोत्रे यांचे पारडे जड झाल्याची चर्चा सर्वत्र रंगू लागली आहे.

## सुस्ते येथे ६१ जणांनी केले रक्तदान.

पंढरपूर - तालुक्यातील सुस्ते येथे माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनदादा शिंदे यांच्या ७३ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ६१ जणांनी रक्तदान केले.

प्रारंभी येथील जेष्ठ सेवानिवृत शिक्षक छगन चव्हाण व विविध कार्यकारी सोसायटीचे माजी व्हाईस चेअरमन धनंजय चव्हाण यांच्या हस्ते या रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संतोष सुळे, अतुल चव्हाण, गणेश बोबडे, संभाजी चव्हाण, हनुमंत चव्हाण, बाबुराव बोबडे, मुकुंद चव्हाण, रणजीत चव्हाण हनुमंत नागटिळक, विनायक चव्हाण, अम ोल शेळके, संजय पाटील उपस्थित होते.

## सक्षम बना

## सरश्री



आपण सगळेच निर्णय घेत असतो कारण प्रत्येकवेळी प्रत्येक क्षण निर्णायकच असतो. कुटुंबातील अनेक निर्णय गृहिणींना घ्यावे लागतात. उपजीविकेसाठी कोणते काम करावे... नोकरी करावी की स्वतंत्र व्यवसाय करावा... संसाराला केव्हा लागावे... असे निर्णय तरुणांना घ्यावे लागतात. विद्यार्थ्यांना काय शिकवावे, याबद्दलचे निर्णय शिक्षकांना घ्यावे लागतात. देशाच्या कारभाराबद्दलचे, उन्नतीचे, अर्थव्यवस्थेचे, देशाच्या रक्षणाचे असे अनेक मोठमोठे आणि अवघड निर्णय सरकारला घ्यावे लागतात. सर्वांत कठीण निर्णय घ्यायची पाळी येते डॉक्टरांवर, वकिलांवर, न्यायव्यवस्थेवर; कारण त्यांचा प्रत्येक निर्णय कुणाच्या तरी आयुष्याशी घनिष्टपणे संबंधित असतो.

मोठ्या, अविभक्त कुटुंबात, निर्णय घ्यायचा अधिकार बहुधा घरातल्या सर्वांत मोठ्या माणसाकडे असतो. घरातल्या प्रत्येकासाठी सगळे निर्णय ही मोठी माणसेच घेतात. त्यांच्या आयुष्यातील स्वतःच्या अनुभवाच्या आधारावर हे निर्णय घेतलेले असतात.

ज्या माणसाला जीवनात स्वतःचे निर्णय स्वतःच घ्यायचे असतील त्याने स्वतःला सक्षम करणे ही सर्वांत महत्त्वाची आणि मुख्य बाब आहे. स्वतःची जबाबदारी घ्यायला शिकल्यावरच प्रत्येक जण स्वतः साठी चांगले काय आणि वाईट काय ते ठरवू शकेल. यासाठी स्वतःचे निर्णय स्वतः घ्या. त्या निर्णयाची जबाबदारी स्वतः घ्या, मग ते निर्णय चुकीचे होते असे सिद्ध झाले तरी हरकत नाही. परंतु या सर्वासाठी आधी सक्षम बनणे महत्त्वाचे आहे.

निर्णय न घेणे हा सुद्धा एक प्रकारचा महत्त्वाचा निर्णयच आहे. समजा काही कारणाने तुम्ही एखादा नेमका निर्णय घेऊ शकत नाही आणि घाईघाईने, उतावळेपणाने कुठला तरी निर्णय घेऊन मोकळे होण्याची तुमची इच्छा नाही. अशावेळी 'सध्या मला कोणताच निर्णय घ्यायचा नाही कारण आत्ता मी योग्य निर्णय घेण्याच्या मनःस्थितीत नाही. थोडा काळ जाऊ दिला की मी स्वतःसाठी योग्य निर्णय नक्की घेऊ शकेन' असा निर्णय घ्या

**तेजज्ञान फाउंडेशन**
**9921008060**
**helpdesk@tejgyan.org**

हे पत्र मुद्रक सोमनाथ नवनाथ शिंदे यांनी प्रकाशक सचिन हरी आदापुरे व मालक सचिन हरी आदापुरे यांचे करीता दर्लिंग ग्राफिक्स, जुना बस स्टँड शेजारी, दर्शन उद्योग भवन, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथे छापून घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर येथून प्रकाशित केले. संपादक : सचिन हरी आदापुरे, घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर मो.नं.९८५००२७६४३ (या अंकात प्रसिध्द झालेल्या मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्ष-पंढरपूर)

printed by SOMNATH NAVNATH SHINDE and published by SACHIN HARI ADAPURE and on behalf of SACHIN HARI ADAPURE printed at DARLING GRAPHICS, near old bus stand, darshan udyog bhavan , pandharpur, Dist - Solapur and published by Nath chouk pandharpur Editor : Sachin Hari Adapure, House No 1225, Nath chouk, Pandharpur Mob.9850027643



# संत पेठ येथे पिण्याच्या पाइपलाइन चे उद्घाटन

## माजी नगराध्यक्ष वामन तात्या यांच्या प्रयत्नांना यश

पंढरपूर प्रतिनिधी –माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन करण्यासाठी करोडो रुपयाचा निधी मंजूर करून संत पेठ परिसरातील हजारो नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटविला आहे. याचा सातत्याने पाठपुरावा माजी नगराध्यक्ष वामन तात्या बंदपट्टे व या भागातील युवा कार्यकर्ते भावी नगरसेवक अशोक शिंदे( पिंटू माळी)यांनी केल्याने आता गोरगरिबांच्या अंगणात गंगा अवतरली आहे. परिचारक यांच्या रूपातून प्रत्यक्ष पंढरीचा विठोबा पावला आहे अशा भावना भूमिपूजन प्रसंगी येथील जनतेने व्यक्त केल्या.पंढरपूर शहरातील संत पेठ परिसरातील रमाई नगर ते आराम गादी कारखाना आणि बागवान मोहल्ला परीसर गरड गल्ली या संपूर्ण प्रभागात पिण्याच्या पाण्याची समस्या अनेक वर्षापासून होती,पिण्याचा पाण्यासाठी या भागातील लोकांना पुर्वी वणवण फिरावे लागत असायचे,. महीला, माता भगिनी यांचा हा त्रास आता संपुष्टात येणार आहे.

आपल्या भागात आता पाणी येणार या सुवार्तेने नागरिकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले,नागरिकांतून माजी नगराध्यक्ष वामन तात्या बंदपट्टे, भावी नगरसेवक अशोक शिंदे उर्फ पिंटू माळी यांचे कौतुक केले जात आहे. यावेळी आसिफ बागवान, अब्दुल रज्जाक आत्तार चडचणकर जमीर शेख उल्हास शिंदे, बाबा फकीर मुजीब बागवान, नासिर मुजावर सिकंदर बागवान महंमद अली बागवान उपस्थित होते.

# स्वेरीचे सामाजिक कार्य कौतुकास्पद –अधिक्षिका श्रीमती राजश्री गाडे

## स्वेरीतर्फे नवरंगे बालकाश्रमाला पाणी शुद्धीकरण यंत्र भेट



पंढरपूर 'विशेष करून ग्रामीण भागात 'स्वेरी' ही शिक्षणसंस्था शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबरोबरच सामाजिक कार्यात देखील सातत्याने सहभाग घेवून स्तुत्य कार्य करत असते. स्वेरीचे विद्यार्थी प्रत्येक सामाजिक व विधायक कार्यात तहान भूक विसरून मनापासून कार्य करत असतात. स्वेरीचे सामाजिक कार्य खरोखर कौतुकास्पद असते.' असे प्रतिपादन पंढरपूर शहरातील नवरंगे बालकाश्रम व्यवस्थापनाच्या अधिक्षिका श्रीमती राजश्री गाडे यांनी केले.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूरने सामाजिक सेवेची आणखी एक चुणूक दाखवत एक स्तुत्य उपक्रम राबवला. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार आणि उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या सहकार्याने इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाच्या 'इलाईट फोरम' मार्फत पंढरपूर मधील वा.बा. नवरंगे बालकाश्रमाला पाणी शुद्धीकरण यंत्र भेट देण्यात आले. यावेळी व्यवस्थापनाच्या अधिक्षिका श्रीमती राजश्री गाडे मार्गदर्शन करत होत्या. सामाजिक कार्य करताना आपल्या देण्याने दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर जो आनंद असतो तो भेट वस्तूच्या किमतीच्या कितीतरी पटीने अधिक असतो. नवरंगे बालकाश्रमाच्या व्यवस्थापनाकडून अधिक्षिका राजश्री गाडे, व्यवस्थापक सुचित्रा पवार आणि लेखाधिकारी धर्मराज डफळे यांनी स्वेरीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने करण्यात आलेली ही कृती महाविद्यालयाच्या समाज कल्याणासाठीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे. हे पाणी शुद्धीकरण यंत्र बालकाश्रमातील मुलांना स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. नवरंगे बालकाश्रमाच्या व्यवस्थापनाने स्वेरीच्या या भेटवस्तू बाबत आभार मानले. सदरची वस्तू ही बालकाश्रमातील मुलांचे आरोग्य जतन करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाने एकता आणि सामूहिक जबाबदारीचा संदेश दिला, जो स्वातंत्र्य दिनाच्या खऱ्या अर्थाला अधोरेखित करतो. स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग हे समाजाच्या प्रगतीसाठी अविरतपणे कार्य करत आहे. या देणगी समारंभात बालकाश्रमाचे लेखाधिकारी धर्मराज डफळे, इलाईट फोरमचे समन्वयक प्रा. एस. आर. वाघचवरे, प्रा. एम.ए. सोनटक्के, प्रा. एस.एस. गावडे, प्रा. ए.ए. गरड, इलाईट फोरमचे अध्यक्ष तुषार बर्ले आणि गिरीजा देशमुख यांच्या सह इलाईट फोरमचे सदस्य उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील राज्य शासकीय कर्मचारी व नगरपरिषद नगरपंचायत व संवर्ग कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्याबाबतची सुकाणू समितीची बैठक संपन्न

## राज्य शासनाच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना, युनिफाईड निवृत्ती योजनेसह सुधारित निवृत्तीवेतन योजनेतून एका पर्यायाची निवड करता येणार

पंढरपूर – महाराष्ट्र राज्य नगर परिषद नगरपंचायत कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्या वतीने दिनांक ६ ते ८ ऑगस्ट २०२४ रोजी तीन दिवसाचे काम बंद आंदोलन व मा. आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय बेलापूर नवी मुंबई ते मंत्रालय असा लाँग मार्च आंदोलन कॉ. डॉ .डी. एल कराड व अँड .सुरेश ठाकूर, अँड.संतोष पवार, अनिल जी जाधव, रामगोपाल मिश्रा, अँड. सुनील वाळूजकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते व राज्य शासकीय कर्मचारी संघटना यांनीही वेळोवेळी आंदोलन करून संपाचा इशारा दिला होता यास अनुसरून आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे राज्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी यांच्या बैठकीचे आयोजन केले होते. महाराष्ट्र राज्य शासकीय मध्यवर्ती कर्मचारी संघटना व महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाचे पदाधिकारी यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आय. एस. चहल , मुख्यमंत्र्याचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे , वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता , सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे सल्लागार ग.दी. कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, अखिल भारतीय राज्य सरकारी महासंघाचे उपाध्यक्ष विश्वास काटकर,महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीचे मुख्य संघटक अँड.संतोष पवार, अनिलजी जाधव यांची सह्याद्री अतिथी गृह येथे कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नाबाबत बैठक संपन्न झाली या झालेल्या बैठकीमध्ये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या बाबत चर्चा झाली राज्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या नव्याने जाहीर झालेल्या युनिफाईड निवृत्तीवेतन योजना, राष्ट्रीय पेन्शन योजना आणि राज्य शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनात जाहीर केलेल्या सुधारित निवृत्ती योजनेपैकी एका पर्यायाची निवड करण्याची संधी देण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मुख्यमंत्री यांच्या या निर्णयावर विविध अधिकारी आणि कर्मचारी संघटनांनी सहमती दर्शवत राज्य शासकीय मध्यवर्ती कर्मचारी संघटना यांनी आंदोलन मागे घेण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला तसेच या चर्चेची वेळी महाराष्ट्रातील नगरपरिषद नगरपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या बाबत मुख्य संघटक अँड.संतोष पवार यांनी मुख्यमंत्री महोदय यांच्यासमोर खालील मागण्यावर चर्चा केली त्यामध्ये प्रामुख्याने राज्यातील ३००० संवर्ग कर्मचाऱ्यांचे दिनांक ऑगस्ट २९ ऑगस्ट २०२४ पासून बेमुदत काम बंद आंदोलन चालू आहे याबाबत राज्य शासनाने लक्ष घालून त्वरित त्यांच्या मागण्या संदर्भात बैठक लावावी अशी मागणी करण्यात आली यावेळी प्रधान सचिव यांनी शुक्रवारी याबाबत मीटिंग लावण्याचा आश्वासन दिले तसेच महाराष्ट्रातील सर्व नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी यांना १०/२०/३० ची आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला महाराष्ट्रातील नगरपरिषद नगरपंचायत मधील सर्व कर्मचाऱ्यांचे विना शर्त विना अट समावेशन व सफाई कर्मचाऱ्यांचे आकृती बंधामध्ये पदे मंजूर करून त्यांचेही समावेशन करण्याबाबत मुख्यमंत्री महोदय यांच्या समवेत चर्चा झाली त्यांनी लवकरात लवकर याबाबत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन यावेळी दिले यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, आपण सर्व अधिकारी कर्मचारी शासनाचा भाग आहात सर्वांना न्याय मिळावा व शाश्वत निवृत्तीवेतन मिळावे ही आमची भावना आहे शासन शब्दाला पक्के असून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही संघटनाची मागणी लक्षात घेऊन सर्व कर्मचाऱ्यांना योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न शासनाच्या वतीने करण्यात येईल राज्य शासनाने जाहिर केलेली सुधारित निवृत्ती वेतन योजना निवडण्याची संधी त्यामुळे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना या योजनांचा अभ्यास करुन त्यांच्या दृष्टीने फायद्याची योजनेची निवड करता येणार आहे, असे ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले या झालेल्या चर्चेच्या वेळी अँड.संतोष पवार व अनिलजी जाधव यांनी नगरपरिषद नगरपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्याबाबत ठोस भूमिका घेतल्याने नगरपरिषद नगरपंचायत कर्मचाऱ्यांचा प्रश्न मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला झाला असल्याचे संघर्ष समितीचे मुख्य संघटक अँड .सुनील वाळूजकर यांनी यावेळी सांगितले

# आरोग्यमंत्र्याच्या पुतण्याने वाटल्या २५०० गणेश मूर्ती



पंढरपूर – सध्या राज्यात विधानसभेच्या तयारीचे राजकीय वारे वाहत असतानाच याच धामधुमीत राजकीय श्रीगणेशा करण्याच्या दृष्टीने भैरवनाथ साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अनिल सावंत यांनी पंढरपूर मंगळवेढा या मतदारसंघात २५०० घरगुती गणपतीचे वाटप करून राजकीय श्रीगणेशा केला.

विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या मतदारसंघात सध्या अनेकजण उमेदवारीसाठी इच्छुक होऊ लागले आहेत. इच्छुकांची आकडेवारी दिवसेंदिवस वाढत असताना त्यातून आपली राजकीय मोर्चे बांधणी करत असताना त्या त्या उमेदवाराला राजकीय राजश्रय असणे आवश्यक आहे त्या दृष्टिकोनातून या मतदारसंघात सध्या भाजपकडून विद्यमान आमदार समाधान आवताडे हे दावेदार मानले जात आहेत.मात्र विधानसभा निवडणुकीचा आखाडा अद्याप जाहीर झाला तरी राजकीय आखाड्याचा मुहूर्त साधण्याच्या दृष्टीने उद्यापासून सुरू होणाऱ्या गणरायाचे स्वागत करण्यासाठी मतदारसंघातील गणेशभक्त तयारीत असतानाच भैरवनाथ कारखान्याचे उपाध्यक्ष अनिल सावंत यांनी मतदारसंघातून २५०० गणेश मूर्तीचे वितरण करून आपला राजकीय श्रीगणेशा करण्याचा प्रयत्न केला.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती आयोजित पंढरपूरकरांना मिळतेय सांस्कृतिक मेजवानी



**पंढरपूर –** श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर यांचे वतीने आयोजित सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सव संगीत महोत्सवाची दिमाखात सुरुवात झाली.

सुरुवातीला प्रथम सन्माननीय सदस्या शकुंतला नडगिरे मॅडम व्यवस्थापक मनोज श्रोत्री गायक अवधूत गांधी यांच्या शुभहस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या प्रतिमा पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले.आणि कार्यक्रमाला सुरुवात झाली.वारकरी सांप्रदायाचा बीज मंत्र जय जय राम कृष्ण हरी या ने सर्व वातावरण भक्तीमय होत. रुपाचा अभंग.ध्यानाचा अभंग.ज्ञानियांचा राजा गुरु महाराव.काय सांगू देवा ज्ञानोबाची ख्याती.चित्रपट गीत हेचि येळा यानंतर आईचा गोंधळ.गणरायाचे स्तवन. गवळणी गाई गोपाळ यमुनेच्या तटी. नका मागे घेऊ.शिवबा राज.युगत मांडली. अनेक सुंदर विविध लोकसंगीत असे गायन भक्ती गीते शिवाजी महाराजांची पोवाडे स्फूर्ती गीते सादर करून अतिशय उत्साही वातावरण पहिल्याच दिवशी निर्माण होऊन शेवटी हेचि दान देगा देवा भैरवी गात कार्यक्रमाची सांगता केली.त्यांना तितकीच अप्रतिम सुंदर अभ्यासपूर्ण भावपूर्ण निरुपण व हार्मोनियम अभय नलगे तबला पांडुरंग पवार पखवाज राजेंद्र बघे.टाळ प्रसाद भांडवलकर स्वर साथ विजय सोनवणे .संबळ.सोमनाथ तरटे.दिमडी सुरज तरटे यांनी दिली.तर सुत्रसंचलन ज्ञानेश्वर दुधाणे यांनी केले.कार्यक्रमाच्या पहिल्याच दिवशी पंढरपूरकर रसिक श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद देत कार्यक्रम यशस्वी केला. तीन दिव गौरी आगमनामुळे तीन दिवस कार्यक्रम नसले तरी पुढील १२ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर पर्यंत भरगच्च कार्यक्रम आहेत त्याही कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने करण्यात आले आहे.महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्व् पदाधिकारी.अधिकारी.कर्मचारी अधिक परिश्रम घेत आहेत.

